पुढारी 29 JUN 2016
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील तीनशे विद्यार्थ्यांचे मरणोत्तर अवयवदान

## १७० मुले, १३० मुलींचा समावेश; जपले समाजभान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील तीनशे विद्यार्थ्यांनी सामाजिक भान जागवत मरणोत्तर अवयदान उपक्रमात नोंदणी केली आहे. यामध्ये १७० मुले व १३० मुलींचा समावेश आहे. समाजासमोर एका चांगल्या उपक्रमाचा पायंडा यानिमित्ताने संबंधित विद्यार्थ्यांनी घालून दिला आहे.

आधुनिक जीवनशैलीचा आधार घेत अलीकडे तरुणाईबद्दल सतत नकारात्मक बोलले जाते. मात्र, तरुणाईतील एक मोठा प्रवाह सतत आदर्शवत काम कर असतो. या तरुणाईच्या गटाची संख्याही मोठी आहे. शिवाजी विद्यापीठातील तीनशे विद्यार्थ्यांनी मरणोत्तर अवयदान या शासनाच्या उपक्रमात सहभाग नोंदवला.

पाश्चिमात्य देशांमध्ये अवयवदान ही चळवळ परिचित आहे. आपल्याकडे मात्र अजूनही या उपक्रमाकडे मानवी दृष्टिकोनातून पाहिले जात नाही. परंतु, आता मात्र याबाबत जागृती वाढत चालली असल्याचे दिसते. शिवाजी विद्यापीठ व प्रेस्टिज कन्सलटन्सी सर्व्हिसेस यांनी घेतलेल्या संयुक्त उपक्रम कार्यशाळेत या तीनशे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे नोंदणी केली आहे.



### अवयदान म्हणजे?

अवयव दान केल्यास सबंधितांच्या मरणानंतर उपयुक्त अवयव (उदा. नेत्र, मुत्रपिंड, हृदय, यकृत, स्वादुपिंड, बोनमॅरो, प्लेटलेट आदी) गरजूंना बसवले जातात. यासाठी दान करणाऱ्या इच्छुकांनी संबंधित फॉर्म भरून द्यावयाचा असतो. हा फॉर्म भरल्यानंतर त्याची रितसर नोंदणी केली जाते. सरकारकडून आता या अवयवदान उपक्रमाचे पोर्टल तयार केले जात आहे. या पोर्टलद्वारे ही प्रक्रिया ऑनलाईन केली जाणार आहे. म्हणजेच ज्यांनी अवयदान केले आहे, अशांची नावे सर्व हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असतील.

महाराष्ट्र टाईम्स 29 JUN 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची तिसरी प्रवेशफेरी पूर्ण

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील पदवी आणि पदव्युत्तर, संलग्न महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांची तिसरी प्रवेश फेरी मंगळवारी पूर्ण झाली. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केल्यानंतर उर्वरित जागांवर प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध अधिविभागांत गर्दी केली होती. सायन्स विद्याशाखेची शंभर टक्के प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असून, काही अधिविभागांत मोजक्या जागांवर दोन दिवसांत प्रवेश निश्चित होईल.



शिवाजी विद्यापीठाच्यावतीने ९ ते १३ मे रोजी एमएस्सी, एमसीए, बीजेसी, एमजेसी, बी. लिब, एम. लिब, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमधील एमबीए, एमएसडब्ल्यू, एमआरएस, एम. टेक, एमसीए, आदी ४० अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा घेतल्या होत्या. यापैकी २१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांची गुणवत्ता यादी ज्या-त्या विभागामध्ये १७ जूनला प्रसिद्ध केली होती. गुणवत्ता यादीनुसार अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले होते. शुल्क भरण्यासाठी यावर्षी प्रथमच प्रत्येक विभागात विद्यार्थ्यांना सुविधा निर्माण केली होती. रसायनशास्त्र विभागामध्ये विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याने दोन टप्प्यांत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली होती. तसेच इतर विभागात अन्य विद्यापीठांतील विद्यार्थ्यांसाठी स्पॉट ॲडमिशन प्रक्रिया राबविली. त्यामुळे अनेक अधिविभागांत प्रवेश निश्चित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

महाराष्ट्र टाइम्स 29 JUN 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात तयारी पूर्णत्वाकडे

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

एक जुलै रोजी साजरा करण्यात येणारा कृषी दिवस व वन महोत्सवानिमित्त राज्य सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. याअंतर्गत विद्यापीठामध्येही भारतीय जातींच्या.वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे. सामाजिक वनीकरण विभागाचे उपसंचालक तानाजी पाटील, सहायक संचालक सुहास साळोखे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींनी याच्या तयारीची पाहणी केली.

विद्यापीठामध्ये भारतीय प्रजातीच्या विविध वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे. यासाठी कणेरी येथील काडसिद्धेश्वर मठाच्या सहाय्याने सुमारे दहा हजार खड्डे खोदले आहेत. सिंथेटिक ट्रॅक, सुतार विहीर परिसरता खड्डे खोदले आहेत.

मोहिमेतंर्गत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थित कार्यक्रम होईल. सामाजिक वनीकरण विभागाचे उपसंचालक तानाजी पाटील यांनी पाहणी केली. त्यांच्यासोबत सहायक संचालक सुहास साळोखे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव संजय कुबल, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

दरम्यान, विद्यापीठाने मे महिन्यात परिसरात जलसंधारणाची कामे केली. यामधून एक कोटी लिटर क्षमतेच्या शेततळ्याची निर्मिती केली आहे. परिसरातील सहा विहिरींचा गाळ काढून पाण्याचे स्रोत खुले केले आहेत.

## प्रत्येक अधिकारी देणार पाच झाडे

वृक्ष मोहिमेमध्ये विद्यापीठाच्या सर्व अधिकाऱ्यांचा सहभाग आहे. प्रत्येक विभागाचे अधिकारी प्रत्येकी पाच झाडे विद्यापीठ परिसरात लावण्यासाठी देतील. मलकापूर येथील एका नर्सरीकडे त्याची नोंदणी झाली आहे. अधिकाऱ्यांकडून पाच ते सहा फूट उंचीची वड, पिंपळ, करंजी, कडूनिंब, आवळा, चिंच आदी झाडांच्या जातींना प्राधान्य देणार आहेत.



विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण तयारीसाठी खोदण्यात आलेले खड्डे